# राशिभविष्य - सप्टेंबर, २०१३.

दादा दामले (dadadamle@gmail.com )

==================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्ध अधिक मनस्ताप देणारा असा असल्याचाच अनुभव येईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती निवळेल व मनोनुकुल घटना घडतील. विरोधक पराभूत होतील. या महिन्याच्या काळात कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद ,भांडणे, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी सुखसमाधान लाभेलसे वाटत नाही. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. जपा. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा अन्य कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मंगळ-बुध कुयोग होत असल्याने बुद्धी विकृत होऊन कपटी विचारांचा प्रभाव वाढण्याची शक्यता आहे. जपा. अशा परिस्थितीत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे सुखाचे होईल. ज्यांना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य आहे त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक लाभ होईल. द्रव पदार्थांचे व्यापारी, मनोविकार तज्न्य, चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, वकिली सल्लागारी व्यवसाय असणारांना व साहित्यनिर्मात्या लेखकांना संपूर्ण महिन्याचा काळ प्रगतिकारक वा लाभदायक होईल. या राशीचे विद्यार्थी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखू शकले तरच शैक्षणिक प्रगती करू शकतील. काहीही कारणाने भावंडसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या हर्षलमुळे असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धेने शिवोपासना व श्रीगणेशोपासना कराल तर होणारा मनस्ताप सुसह्य होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीचा स्वभाव या महिन्याच्या काळात अत्यंत अस्थिर, लहरी असा राहण्याची शक्यता दिसते. अशा स्वाभाविक दोषांमुळे कारण असो व नसो, मित्र, सहकारी यांच्याशी वाद, भांडणे होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात सतत काही ना काही कारणाने मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही शक्य आहे. हाती घेतलेल्या कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. त्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत वरिष्ठांचा त्रास, स्वत:चे व मुलांपैकी कोणाचे आजारपण, प्रिय जनांचा दुरावा सहन करावा लागणे, अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ राहीलसे दिसते. दिनांक ८-९ हे दोन दिवस सर्व व्यवहार व आचरण अत्यंत सावधानतेने करावे. पण शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व विपरीत काळ सुसह्य होईल. वकिली-सल्लागारी

व्यवसाय, लोखंडाचे, कोळश्याचे व्यापारी, यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना अस्थिर परिस्थिती, अडचणी, अडथळे सहन करावे लागतील. सर्व प्रकारच्या अपघातापासून जपावे. द्रव पदार्थांचे व्यापारी आणि मनोविकार तज्न्य यांना मात्र काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना सर्व महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. मन व बुद्धी स्थिर राखून आणि सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखून मनापासून अध्ययन करणे जमले तरच या राशीचे विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करू शकतील.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने प्रतिकुलतेची झळ अल्प प्रमाणातच पोचेल, असे वाटते. या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात आर्थिक व्यवहार विचारपूर्वकच करावेत. कारण पैशाची अपेक्षित आवक होईलच असे खात्रीपूर्वक सांगता येत नाही. पण पैशाची जावक मात्र करावीच लागेल. येणे असलेली रक्कम वसूल होईलच याची खात्री नाही. शिवाय अपेक्षित अर्थप्राप्तीसाठी काही मंडळीना खूप कष्ट, परिश्रम करावे लागण्याची शक्यता आहे. तुलनात्मक दृष्ट्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध मनोनुकुल असेल; पण महिन्याचा उत्तरार्ध मात्र या राशीच्या सर्वांनाच मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. वकिली-सल्लागारी व्यवसाय, अकौंटन्सी, अन्य बौद्धिक व कलात्मक नोकरी-व्यवसाय, कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल असला तरी आळस, जडत्व आणि निरुत्साह झटकून त्यांनी मनापासून अध्ययन केल्यासच शैक्षणिक प्रगती साधणे शक्य होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे आरोग्य चांगले राहील; पण शारीरिक उष्णता भडकून डोळे तळावणे, मान, घसा दुखणे, असे विकार होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या मंडळीच्या संततीस त्रास किंवा संततीपासून त्रास होणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. काही मंडळीना प्रवासयोग संभवतो. मन:शांतीसाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख-समाधान व गृहसौख्य या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असाच असणार आहे. आप्तेष्ट भांडणे, चिंता, वाढता खर्च, आर्थिक फ़सवणूक, वित्तहानी अशापैकी घटनांनी व स्वत:च्या स्वाभाविक दोषांमुळे असह्य मनस्ताप होऊन शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकार बळावतील व डोळ्याचे अनारोग्य सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या नोकरदार

मंडळीना नोकरीत प्रतिकुल असाच असल्याचा अनुभव येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल व त्यामुळे मनोनुकुल घटना घडून महिन्याच्या पूर्वार्धातील मनस्तापही कमी होईल, आरोग्य उत्तम राहील. पाण्याशी संबंधित नोकरी व्यवसाय असणारांनी सावधानतेने वागावे. जलभय, विषभय आहे. शास्त्रीय संशोधन व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. अध्यात्म व समाजकार्य यांची मनापासून ओढ असणारांना काळ अनुकुल व सात्विक सुखसमाधान देणारा असाच असेल. शेती व्यवसाय असणारांना शेतीवाडीपासून अपेक्षित लाभ होईल. या राशीच्या काही मंडळीना हातचे सोडून नवीन काही तरी करण्याची ऊर्मी येईल. पण त्यांनी मनावर संयम ठेवून हातात आहे तेच काम करत राहावे. नपेक्षा नुकसान व मनस्ताप सहन करावा लागेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासेतर विषयाचा मोह पडून शैक्षणिक प्रगतीकडे दुर्लक्ष होण्याची दाट शक्यता आहे. जपा. श्रद्धेने श्रीगुरु दत्तात्रेयाची उपासना करून नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण केल्यास मनोबल वाढेल व नैराश्य दूर होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचे एकूण ग्रहमान फ़ारसे अनुकुल नाही, असेच म्हणावे लागते. अस्वस्थ मन, गैरसमज, वादविवाद, भांडणे, मानहानी, जुन्या प्रकरणांचा त्रास अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. त्याशिवाय वाढता खर्च, नियोजित कार्यात अडथळे येणे, फ़सवणूक होणे अशापैकी कारणांनीही शरीर-मन थकून जाणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष काळजी घ्यावी. काही मंडळीना डोळ्याच्या दुखण्याचा त्रास सहन करावा लागेल. दिनांक ८-९ या दोन दिवशी विशेष जपा. शनि-राहूमुळे भावंडसुखात बाधा येणे संभवते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून लाभदायक मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काही मंडळीना नवे कार्यक्षेत्र मिळेल; तर काहींना मनपसंत नोकरी मिळेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळीना मानाचे स्थान मिळून त्यांची प्रतिष्ठा वाढेल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतीना विवाहयोग संभवतो. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख मिळेलच याची खात्री वाटत नाही. वकिली-सल्लागारी, अकौंटन्सी, चिकित्सक बौद्धिक व कलात्मक व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नेपच्यून-मंगळ अशुभ योगामुळे वैवाहिक जीवनातील सुखात काही ना काही कारणाने बाधा येणे संभवते. सतत अत्यंत सावधानतेने आचरण करा. अपघातभय संभवते. मन:शक्तीसाठी कुलदेवतेची उपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीनी सध्या शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे याची जाणीव ठेवूनच सतत संयम व सहनशीलतेने आचरण करावे. शनि-राहूच्या प्रतिकुलतेमुळे या

महिन्याच्या प्रथम सप्ताहात कौटुंबिक कलहामुळे कुटुंबात काही अनिष्ट घटना घडून कौटुंबिक सुखसमाधानात बाधा निर्माण होण्याची दाट शक्यता जाणवते. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील. कोर्ट प्रकरणे असतील तर अधिकच त्रास होईल. आवश्यक आर्थप्राप्तीसाठी अथक परिश्रम करावे लागल्याने अनारोग्य होणेही संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्तीला लगाम घालून आचरण करणेच सुखाचे होईल. दिनांक ७ नंतर बुध-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे परिस्थितीत थोडा बदल घडेल व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. सतत सकारात्मक विचार करू शकाल तर काल्पनिक चिंतांचा त्रास होणार नाही; व त्यामुळे आरोग्यही उत्तम राखू शकाल. दांपत्यजीवनात जीवनसाथीच्या विक्षिप्त व लहरी आचरणामुळे, मतभेदामुळे वादविवाद होणे संभवते. त्यामुळे वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभणे अशक्य होईल. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी संशयाने, गैरसमजाने वा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती सामोपचाराने मिटवावीत. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या केतूमुळे अपघात भय असून अनारोग्य होणेही संभवते. काही मंडळीना त्वचारोगाचा तर काहीना रक्तविकार वा मुखदंततविकाराचा त्रास होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे बौद्धिक व शैक्षणिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. इतरांना कष्टपरिश्रम करूनच अपेक्षित अर्थप्राप्ती होणे संभवते. काहीही कारणाने मैत्रीत बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना सर्व प्रकारच्या आरोग्याचे दृष्टीने व वैवाहिक जीवनातील सुखाचे दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असाच असल्याचा अनुभव येईल. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. बदलीमुळे किंवा अन्य कारणाने
कुटुंबातील काही सदस्यांचे स्थलांतर होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे प्रिय जनांच्या दूरत्वामुळे या राशीच्या मंडळीना नैराश्य येणे संभवते. दांपत्यजीवनात दोघांपैकी एकाच्या अनारोग्यामुळे वा अन्य कारणाने वैवाहिक जीवनात बाधा निर्माण होणे संभवते. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. त्यामुळे मनोनुकुल व लाभदायक घटना घडतीलसे वाटते. काही मंडळीना नवे मित्र मिळतील. धनलाभ संभवतो. त्यामुळे सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात मन अस्वथ करणाऱ्या घटना घडतील, नोकरीत कामाचा असह्य ताण सहन करावा लागेल. वरिष्ठांशी मतभेद होतील व त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. त्यातून धननाश होणे शक्य आहे. . पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. अध्यात्मात रस असलेल्या मंडळीना गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे आध्यात्मिक उपासनेत प्रगती करणे व मन:शांती मिळविणे शक्य होईल. शास्त्रीय संशोधन व

गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे व्यवसायात अनुकुल व लाभदायक घटना घडतील. थोरामोठ्यांच्या मदतीने प्रगतीचा मार्ग सापडेल. प्रवास योग येतील. मनोबल प्राप्तीसाठी हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा

**(८) वृश्चिक -** या राशीच्या सर्वच मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व लाभदायक होईलसे दिसते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना वेतनवाढ, बढती, उच्च पद असे काही प्राप्त होणे संभवते. सामान्य नोकरदार मंडळीच्या बाबतीतही काही मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना, उच्च बौद्धिक संशोधन कार्यात मग्न असणारांना, साहित्यिकांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय करत असणारांना थोरामोठ्यांच्या ओळखीने व्यावसायिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या सर्वांच्याच इच्छाआकांक्षा कमी अधिक प्रमाणात पूर्ण होतीलसे दिसते. काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. पण शक्यतो प्रवास टाळा. कारण प्रवासात त्रास होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील त्यांना तसा धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. असे असले तरी शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने या राशीच्या सर्वांनीच आर्थिक व्यवहार जपून करावेत. विशेष करून दिनांक १०-११ या दोन दिवशी असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मानहानिकारक घटना अधिक प्रमाणात घडण्याची शक्यता आहे. जपा. तसेच गैरसमजाने कौटुंबिक सुखातही बाधा येऊ शकेल. त्यामुळे सर्व प्रकारच्या आरोग्यावर परिणाम होईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल. शिवाय दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात सर्व प्रकारच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागणार आहे. शारीरिक कष्ट व मनस्ताप यांमुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णतेच्या विकारांचा त्रास होईलसे दिसते. विशेष करून काही मंडळीना मूळव्याधीचा तर काहींना पोटदुखीचा त्रास होणे संभवते. सतत मनावर ताबा ठेवून सावधानतेने आचरण करा. कारण अपघातभय आहे. वीज, पाणी यांपासून धोका संभवतो. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरी-व्यवसायात विरोधी परिस्थितीला सामोरे जावे लागेलसे दिसते. वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह कटाक्षाने टाळा. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल व नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील. वकिली-सल्लागारी व्यवसाय, अकौंटन्सी, कोळसा, लोखंड व्यापारी, कला क्षेत्रातील मंडळी या सर्वांना महिन्याचा उत्तरार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. अध्यात्म, गूढ संशोधन

कार्यात कार्यमग्न असणारांना काळ अनुकुल व सात्विक सुखशांती देणारा असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह होतील किंवा ठरतील. तसेच काही युवकयुवतींचे प्रेमसंबंध जुळून येतील. काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. असे असले तरी काही ना काही कारणाने गृहसौख्य लाभेलसे दिसत नाही. तसेच मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे विक्षिप्त आचरण अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतही अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. श्रद्धा असेल तर गुरुदेव श्रीदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे "बावन्नश्लोकी गुरुचरित्राचे" पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. एखादा अपवाद वगळता घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप सहन करतच महिन्याचा काळ व्यतीत करावा लागेलसे दिसते. केवळ गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने शारीरिक आरोग्य चांगले राहण्याची शक्यता दिसते. तसेच नोकरी-व्यवसायात घडणाऱ्या मनाविरुद्ध घटना सहन करण्याची शक्ती मिळेलसे दिसते. पण वकिली, सल्लागारी व्यवसाय, कमिशन, दलाली व्यवसाय, अकौंटन्सी, खाण व्यवसाय लोखंड, कोळसा व्यापारी यांना व उच्च बौद्धिक संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ काही प्रमाणात अनुकुल व लाभदायक होईल. गुरु-नेपचूनमधील शुभ योगामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शक्ती व मनस्वास्थ्य मिळू शकेल. काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. इतर नोकरी-व्यवसाय असणारांना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. सट्टा, लॉटरी, जुगार यांच्या मोहात पडून आर्थिक नुकसानच होईल. जपा. त्याशिवाय आर्थिक व्यवहार सावधानतेनेच करा. कोणाच्या आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारू नका. स्वत:च्या आर्थिक व्यवहारात काही घोटाळे होणार नाहीत याची काळजी घ्या. कौटुंबिक व दांपत्यजीवनात मतभेद, वाद, कोणाचे अनारोग्य कोणाशी न पटणे अशापैकी कारणांनी सुखसमाधान मिळेलच याची खात्री देता येत नाही. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाची आचरणविषयक समस्या, कोणास आलेले नैराश्य अशापैकी कारणांनी अपेक्षित संततिसुखही लाभण्याची शक्यता दिसत नाही. अशा एकूण परिस्थितीत संयम व सहनशीलतेने आचरण करून प्रतिकुल काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर मारुतीची उपासना अनुकुल होईल. दररोज मनापासून हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचे मन सध्या अत्यंत कोमल झाले असण्याची शक्यता वाटते. तसेच मानसिक संवेदनाही अति शीघ्र झाल्या असाव्यात असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेसे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. त्याचप्रमाणे स्वभावही अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी असा घडला असल्याचे जाणवते. अशा परिस्थितीत कोणाचाही धाक वा

कसलेही दडपण सहन होत नसले पाहिजे. त्यामुळे फ़टकळ बोलणे होत असेल तर इतरांची मने अकारण दुखावली जाण्याची शक्यता आहे. जपा. जिभेवर ताबा ठेवा. तसे घडू नये म्हणून या राशीच्या मंडळीनी आध्यात्मिक उपासनेत लक्ष घालावे, हे उत्तम. या राशीच्या काही मंडळीना पोटविकाराचा, अपचनाचा किंवा मूत्राशयविकाराचा त्रास होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात दांपत्यजीवनात काहीही कारणाने सुखसमाधान मिळेलसे दिसत नाही. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक व संततिसुखात बाधा येईल तर नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लगेल. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना व कमिशन, दलाली व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्रहकांकडूनच अधिक अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज "बावन्नश्लोकी गुरुचरित्रा"चे व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात स्वाभाविक दोषांवर नियंत्रण ठेवले तर खूपच सुखाचे होईल. या राशीच्या लहान मुलांकडे त्यांच्या पालकांनी बारकाईने लक्ष देणे जरूरीचे होईल. कारण त्यांच्या हूड, अस्थिर, लहरी व व्रात्य वृत्तीमुळे त्यांच्या हातून न कळत नुकसानकारक घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. मनासारखे न घडल्यास लगेच गहरे नैराश्य येणे संभवते. काही मंडळीना आर्थिक चिंता सतावतील. या राशीच्या युवकांनी कुसंगतीपासून जपावे. या राशीच्या मंडळीना कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल; पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. तसेच विविध कारणांनी अपेक्षित संततिसुख लाभेलसे दिसत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, चिकित्सक शास्त्रीय संशोधन नोकरी-व्यवसाय असणारांना, गुप्त पोलीस खात्यात काम करत असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ प्रगतिकारक असल्याचा अनुभव येईल. गुरु-शुक्र शुभ योगामुळे या राशीच्या मंडळीना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. काहींना भूमिलाभ, तर काहीना धनलाभ, प्रतिष्ठा, मानसन्मान प्राप्त होणे शक्य दिसते. व्यापार-व्यवसाय असणारांना भरभराट होत असल्याचा अनुभव येईल. वाम मार्गाने धन देण्या-घेण्याचा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. अष्टम स्थानी असलेल्या शनिमुळे काही मंडळीना अपेक्षाभंग होत असल्याचा तर काहींना अनारोग्याचा वा मन अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा त्रास सहन करावा लागेल. जपा. श्रद्धेने श्रीगुरु दत्तात्रेयाची व हनुमानाची उपासना करा. मन:शक्ती लाभून सुख-शांति-समाधान लाभेल.